# मॅन्युअल २०

## अन्य माहिती

**२०.१** सार्वजनिक आस्थापनेस वेळोवेळी विचारण्यात येणारे प्रश्न व त्यांची उत्तरे.

अ. अनधिकृत पशुवध, मांस वाहतुक विक्री यासंबंधी कारवाई.

उत्तर- यासंबंधी कारवाई सहा. आयुक्त (बाजार) यांच्या अखत्यारीतील खास दक्षता पथकांकडून केली जाते. यासंबंधी सहा. आयुक्त (बाजार) यांजकडे संपर्क साधावा.

ब. वधासाठी आणल्या जाणा-या जनावरांची वाहतूक करताना होणारे क्रौर्य (गाडीत प्रमाणाच्या बाहेर जनावरे भरणे, मारहाण, इ.)

उत्तर- यासंबंधी प्रिव्हेंशन ऑफ क्रूएल्टी टू ऍनिमल्स ऍक्ट १९६०, टान्सपोर्टस रुल्स १९७८ च्या नियमांतर्गत पोलीसांकडे तक्रार केल्यास पोलीसांकडून कारवाई करण्यात येते.

क. मांसाच्या निर्यातीसाठी पशुंचा वध करण्यास अनुमती आहे का ?

उत्तर- निर्यातीला चालना देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणानुसार पशुवधगृहाची अतिरिक्त क्षमता निर्यातीसाठी शेळया-मेंढया व म्हशी यांचा वध करण्याकरिता वापरली जाते.

ड. महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ ची अंमलबजावणी केली जाते का ?

उत्तर- शृंगी जनावरांची तपासणी सरकारी पशुवैद्यकीय अधिका-यांमार्फत महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ सुधारणा १९९५ नुसार केली जाते व त्यानुसार वधास योग्य असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होते. पशुवधगृहात प्रत्यक्ष जनावर व उपरोल्लेखित प्रमाणपत्र पाहूनच शृंगी जनावरांच्या वधाला अनुमती दिली जाते.

ई. देवनार पशुवधगृहातील मागील पाच वर्षातील उत्पन्न खर्च. पशुवध याचा तक्ता सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात आलेला आहे. तसेच माहितीचे वाचन करण्यासाठी कक्ष उपलब्ध आहे.

**२०.२ <u>माहिती मिळविण्यासंबंधी :-</u>**

- अर्जाचा नमुना.
- शुल्क, रु.१०.०० चा कोर्ट फी स्टॅम्प.
- माहिती मागविण्याची पध्दत. थोडक्यात निश्चित माहिती जी उपलब्ध आहेत. ती मागवावी. अर्जाचा नमुना पुढील प्रमाणे.

# जोडपत्र अ

(पहा नियम ६(१) )

येथे रु.१० चा
न्यायालय फी मुद्रांक
चिकटवावा.

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ अन्वये अर्जाचा नमुना**

प्रति,

शासकीय माहिती अधिकारी,

(कार्यालयाचे नांव व पत्ता)

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव

२) पत्ता

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -

(एक) माहितीचा विषय.

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन +

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः
आवश्यक आहे किंवा कसे :
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त)
शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.)

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत :
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी

# प्रतिज्ञापत्र

मी, -------------------------- (अपीलदाराचे नांव) --------------------------------------- ----चा मुलगा/ची मुलगी/ची पत्नी, याद्वारे घोषित करीत आहे की, अपिलामध्ये दिलेला तपशील माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे सत्य व अचूक आहे आणि मी कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपवून ठेवलेली नाही.

ठिकाण :

दिनांक :

**अपीलकाराची स्वाक्षरी**

प्रति ---------------------- (अपिल प्राधिका-याचे नांव व पत्ता) - माहिती देण्यास नकार दिल्यास अपील करण्यासंबंधी नागरिकांचा अधिकार यासंबंधी अपील अधिका-याची नेमणूक केलेली आहे.

# जोडपत्र ब

(पहा नियम ७ (१) )

येथे रु.२० चा
न्यायालय फी मुद्रांक
चिकटवावा.

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश,२००५ च्या कलम ११ (१) अन्वये अपील.**

प्रेषक : ----------------------

(माहिती अधिका-याचे पदनाम)

प्रति,

(अपील प्राधिका-याचे नांव/पदनाम/पत्ता)

१) अपीलकाराचे संपूर्ण नांव :

२) पत्ता :

३) माहिती अधिका-याचा तपशील :

४) ज्या आदेशाच्या विरुध्द अपील केले आहे

५) तो आदेश मिळाल्याचा दिनांक :

६) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

७) माहितीचा तपशील :-

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय :
(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नांव :
(तीन) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :
(चार) अपीलाची कारणे :

ठिकाण :

दिनांक :

**अपीलकाराची स्वाक्षरी**

**२०.३.** या पशुवधगृहात व्यवस्थापनाद्वारे सामान्य जनतेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रशिक्षण कार्यक्रम आज दिनांकापर्यंत आयोजित केलेला नाही.

**२०.४.** जनतेसाठी आज दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत नाही.

**२०.५.** आस्थापनेकडे होणा-या पंजीकरणासंबंधी माहिती **:-**

उत्तर : पंजीकरणाचा उद्देश.

- व्यापारी, दलाल, गवाल, दावणवाले, हेलकरी, निर्यातदार, ठेकेदार इ. अनुज्ञाप्ती प्राप्त करणे.(अनुज्ञाप्ती प्राप्त करण्याकरिता नागरिकांच्या सनदेचे अवलोकन करावे)

प्रश्न- पात्रता.

उत्तर : संबंधित व्यवसायातील माहिती असणे. शेळया मेंढया दलाल व शेळया मेंढया निर्यातदार अनुज्ञाप्ती मिळण्याकरिता संबंधीत संघटनेची ना हरकत प्रमाणपत्र.

प्रश्न- पूर्व अपेक्षा (असल्यास)

उत्तर : नाही.

प्रश्न- अर्ज कुठे/कुणाकडे सादर करण्यात यावा ?

उत्तर : पशुवधगृहाच्या कार्यालयात महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांजकडे.

प्रश्न- अर्जासाठी शुल्क (असल्यास)

उत्तर : रु.१००.०० इतके नोंदणी शुल्क आहे.

प्रश्न- इतर शुल्क (असल्यास)

उत्तर : दस्तऐवज तपासण्याचा आकार

प्रश्न- अर्जाचे स्वरुप

उत्तर : लेटरहेड किंवा को-या कागदावर नांव, पत्ता संबंधित व्यवसायातील अनुभव इ.

प्रश्न- सोबत सादर करावयाचे दस्तऐवज.

उत्तर : शिधापत्रिका, असल्यास सध्याच्या ओळखपत्राची छायाप्रत, अनुज्ञप्तीधारकाचे पत्र व इतर अनुज्ञाप्ती असल्यास संबंधिचे कागदपत्र (बाजार विभाग अनुज्ञप्ती/दुकान आस्थापना इ.)

प्रश्न- दस्तऐवजांचे प्रपत्र

अर्ज करावयाची पध्दत

उत्तर :आवश्यक त्या दस्तऐवजासह अर्ज या कार्यालयाच्या पत्रव्यवहार विभागात सादर करावा.

प्रश्न- सार्वजनिक आस्थापनेने अर्ज प्राप्त झाल्यावर पुढील प्रक्रियेसाठी अवलंबिलेली पध्दत.

उत्तर : अर्ज संबंधित विभागाकडे पाठविला जातो तेथून अहवाल प्राप्त झाल्यावर महाव्यवस्थापकांच्या स्तरावर अर्जावर निर्णय घेतला जातो.

प्रश्न- पंजीकरणाच्या वैधतेचा कालावधी.

उत्तर : 1 वर्षे (1 एप्रिल ते 31 मार्च)

प्रश्न- नुतनीकरणाची पध्दत.

उत्तर : प्रतिवर्षी संबंधित विभागात अनुज्ञप्ती व अर्ज सादर करुन विहित शुल्क दरवर्षी भरणे.

**२०.६.** देवनार पशुवधगृहामार्फत जनतेला कोणत्याही प्रकारची वीज अथवा पाणी याची जोडणी दिली जात नाही.

**२०.७**. देवनार पशुवधगृहामध्ये बकरी ईद व विशिष्ट धार्मिक सणाच्या निमित्त मोठया प्रमाणामध्ये शेळया मेंढया विक्रीसाठी आणल्या जातात. या शेळया मेंढया खरेदी करुन धार्मिक कार्याकरिता घरी घेऊन जाण्यासाठी मुंबईतील जनता या पशुवधगृहामध्ये बकरी ईद व विशिष्ट धार्मिक सणाच्या निमित्त येते. त्यांना आवश्यक त्या सोयी पुरविल्या जातात. तसेच शृंगी गुरे (फक्त म्हशी) धार्मिक कार्यासाठी खरेदी करुन त्यांचा वध

देवनार पशुवधगृहातच करणे बंधनकारक आहे व त्यासाठी बकरी ईदच्या दिवशी व त्याच्या पुढील २ दिवशी वधासाठी आवश्यक ती व्यवस्था प्रशासनामार्फत केली जाते.

**टीप** : या मॅन्यूअलमध्ये अंतर्भूत असलेली माहिती संकलित करताना आवश्यक ती काळजी घेण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्याचे निदर्शनास आल्यास पुढील आवृत्तीमध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येईल.